दप्तारोध पार करण्यासंबंधी परवानगी
देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-एसआरव्ही-१०८०-बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक :- १८मार्च १९८०

## परिपत्रक

सामान्य प्रशासन विभागाच्या क्रमांक एसआरव्ही-१०७५-दहा, दिनांक २८/१०/७८ च्या परिपत्रकातील आदेशाप्रमाणे व्दितीय श्रेणीतील अधिकाऱ्यांना दप्तारोध पार करण्यास परवानगी देण्यासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार विभाग प्रमुखांना ( Heads of Departments. )प्रत्यायुक्त करण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे तहसीलदाराच्या श्रेणीतील अधिकाऱ्यांना दप्तारोध पार करण्यास परवानगी जिल्हाधिकाऱ्यांनी द्यावी की विद्यमान व्यवस्थेप्रमाणे विभागीय आयुक्तांनी सदर परवानगी द्यावी हा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. महसूल विभागातील तहसिलदारांचा विभागीय संवर्ग ( Divisional Cadre ) आहे त्यामुळे तहसिलदार पदावरील सर्व अधिकाऱ्यांचे सेवा अभिलेख, गोपनीय अभिलेख यांचे परिरक्षण त्या त्या विभागीय आयुक्तांकडून करण्यात येते. तहसीलदारांच्या श्रेणीतील अधिकाऱ्यांची वेतनवाढ रोखण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना आहेत. त्यामुळे मुंबई नागरी सेवा नियमांतील नियम क्रमांक ४८ प्रमाणे दप्तारोध पार करण्यास परवानगी देण्यास विभागीय आयुक्त सक्षम आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात घेऊन शासनाने असा निर्णय घेतला आहे की विभागीय संवर्गाच्या ( Divisional Cadre ) बाबतीत शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०७५-दहा, दिनांक २८/१०/१९७८ मधील परिच्छेद २ मधील आदेशाला अपवाद करण्यात यावा आणि तहसिलदारांच्या बाबतीत दप्तारोध पार करण्यासंबंधी परवानगी संबंधीत विभागीय आयुक्तांनी द्यावी.

राज्यपालांच्या आदेशानुसार व नांवाने,

व. अं. कोटेश्वर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालांचे सचिव,
मुख्य मंत्र्यांचे सचिव,
*प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
*निबंधक उच्च न्यायालय मुंबई,
*निबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र १ मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र २ नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख,आणि
कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग.

*पत्राने

एच-९(५०००-४-८०).